सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकार्यालय**

(अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय)
वनभवन, रामगिरी रोड, पोलिस जिमखाना शेजारी, सिव्हिल लाईन्स, नागपूर -४४० ००१
दुसरा माळा, डीविंग, दूरध्वनी क्रमांक-०७१२-२५५६७८५,

Phone No : ०७१२-२५५६९१६ Email ID apccfnodal@mahaforest.gov.in

ISO 9001: 2015

स्पिडपोस्ट/ईमेलव्दारे- क्रमांक कक्ष-१७/नोडल/नागपूर/आयडी-१३१७४/2631/२२-२३
नागपूर ४४० ००१ दि. 09 /०१/२०२३.

प्रति,
प्रधान सचिव (वने),
महसूल व वनविभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.

विषय: वन संवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत कार्यकारी अभियंता, महापारेषण, नागपूर यांना २२० केव्ही कळमेश्वर ते २२० केव्ही वरूड दरम्यान ट्रान्सिमशन लाईन टाकण्यासाठी नागपूर जिल्हयातील ६.०७६० हे. वनजमिन वळती करणे बाबत.

संदर्भ: १.शासन पत्र क्र. एफएलडी-२०२२/प्र.क्र.३०९/फ-१०, दि.०७.१२.२०२२. —pg.65
२. मुख्य वनसंरक्षक (प्रा) नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१०/जमिन/प्र.क्र./१०९६/२२-२३/ १५९८, दि.०४.०१.२०२३. |pg.123

विषयांकित प्रकरणी संदर्भ क्र.१ वरील शासनपत्रान्वये उपस्थित केलेल्या मुद्यांची माहिती मुख्य वनसंरक्षक (प्रा) नागपूर यांचे कडील संदर्भ क्र.२ वरील पत्रान्वये या कार्यालयास प्राप्त झाली असून सदर मुद्दे निहाय माहिती खालील प्रमाणे शासनास सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शासनाने उपस्थित केलेले मुद्दे | संक्षिप्त उत्तर |
|---|---|---|
| १. | सदर प्रकल्प वन्यजीव भ्रमण मार्गात येत असल्यामुळे, सदर प्रकरणी वन्यजीव मंडळाची मंजूरीची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांच्या कडून अभिप्राय घेवून, त्याप्रमाणे माहिती सादर करावी. | उपवनसंरक्षक (प्रा) नागपूर यांनी मुख्य वनसंरक्षक (प्रा) यांचे मार्फत सादर केलेल्या अहवालानुसार असे कळविण्यात आले आहे की सदर प्रस्ताव वन्यजीव भ्रमणमार्गात येत असल्याने सदर प्रकरणी वन्यजीव मंजूरीची आवश्यकता आहे.<br>या बाबत या कार्यालयाचे स्तरावरून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म. रा. नागपूर यांचेकडून सदर प्रकरणी त्यांचे अभिप्राय देणे बाबत विनंती करण्यात आली होती. त्याअनुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म. रा. नागपूर यांनी त्यांचेकडील कार्यालयीन टिप्पणी दि.३०.१२.२०२२ नुसार सदर प्रस्तावास वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ चे कलम O (1) (g) नुसार वन्यजीव मंडळाची मान्यता प्राप्त करणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक आहे असे अभिप्राय कळविले आहेत. सुलभ संदर्भाकरिता प्रधान मुख्य वनसंरक्षक |

updated //pg.81

| | | |
|---|---|---|
| | | (वन्यजीव) म. रा. नागपूर यांचेकडील कार्यालयीन टिप्पणी दि.३०.१२.२०२२ सोबत सहपत्रीत करण्यात येत आहे. |
| २. | वनभंग झाला असल्यामुळे, दंडनीय नक्त मूल्य भरण्यास प्रकल्प यंत्रणा तयार असल्या बाबत हमीपत्र सादर करावे. | उपवनसंरक्षक (प्रा) नागपूर यांनी मुख्य वनसंरक्षक (प्रा) यांचे मार्फत सादर केलेल्या अहवालानुसार असे कळविण्यात आले आहे की वनभंग झाला असल्याने प्रकल्प यंत्रणा दंडनीय नक्त वर्तमान मूल्य भरण्यास तयार असल्याचे कळविले असून तसे हमीपत्र प्रकल्प यंत्रणेने सादर केले असून ते सुलभ संदर्भाकरिता सोबत जोडण्यात येत आहे. |
| ३. | केंद्रस्थ अधिकारी यांनी सदर प्रकल्पासाठी प्रस्तावित केलेल्या वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा "राखीव वने" असे नमुद केला आहे. परंतू, उपवनसंरक्षक (प्रा) नागपूर यांनी त्यांच्या पार्ट-२ प्रमाणपत्रामध्ये वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा "झुडपी जंगल " असे नमुद केले आहे. सबब, प्रस्तावित वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा "राखीव वने" आहे की "झुडपी जंगल " या बाबत खात्री करून, आवश्यक त्या दुरूस्तीसह पार्ट-२ प्रमाणपत्र (ऑनलाईन व ऑफलाईन) सादर करावे. | उपवनसंरक्षक (प्रा) नागपूर यांनी मुख्य वनसंरक्षक (प्रा) यांचे मार्फत सादर केलेल्या अहवालानुसार असे कळविण्यात आले आहे की प्रस्तावित वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा हा झुडपी जंगल असून भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४ अन्वये अधिसूचित झालेला आहे. सुलभ संदर्भाकरिता अधिसूचनेची प्रत संलग्न करण्यात येत आहे.<br>करिता प्राप्त निर्देशानुसार उपवनसंरक्षक (प्रा) नागपूर यांनी सूधारित पार्ट-२ सादर केला असून त्यात वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा झुडपी जंगल (Notified as Reserved Forest under Section 4 of IFA 1927) असे नमुद केलेले आहे. सुलभ संदर्भाकरिता सूधारित पार्ट-२ ची प्रत सोबत जोडण्यात येत आहे. |
| ४. | पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या क्षेत्राचा ७/१२ उतारा सादर करावा. | उपवनसंरक्षक (प्रा) नागपूर यांनी मुख्य वनसंरक्षक (प्रा) यांचे मार्फत सादर केलेल्या अहवालानुसार असे कळविण्यात आले आहे की पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या क्षेत्राचा ३२८/३ चा ७/१२ सोबत जोडून सादर करण्यात येत आहे. |

शासनास विषयांकित प्रकरणी संदर्भ क्र.२ वरील पत्रान्वये मुख्य वनसरक्षक (प्रा) नागपूर यांचे कडून प्राप्त अहवाल व प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म. रा. नागपूर यांनी त्यांचेकडील दि.३०.१२.२०२२ चे कार्यालयीन टिप्पणी अन्वये दिलेले अभिप्राय सोबत जोडून शासनास सादर करण्यात येत आहेत. शासनास विनंती आहे की सदर अहवालाचे अवलोकन होवून सदर प्रस्ताव पुढील कार्यवाहीस्तव केंद्र शासनास सादर करावा.

सहपत्रः वरीलप्रमाणे

9/1/23

**(नरेश झुरमुरे)**
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी
महाराष्ट्र राज्य, नागपूर

9/1/23 9/1/23

प्रतिलिपीः मुख्य वनसंरक्षक (प्रा) नागपूर यांना माहिती करिता अग्रेषित.